# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या २१४ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत

## मंगळवार, दि. १२ मे, २०२६ रोजी सकाळी ११:३० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २१४ वी (तातडीची) बैठक **मंगळवार, दि. १२ मे, २०२६ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश आण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. आय. जे. तांबोळी | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अजयकुमार जाधव, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर व डॉ. अजयकुमार जाधव, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर यांनी आपली अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="3">विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १ ]</td><td colspan="3">दि. ०२ मे, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २१३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.</td><td rowspan="2">सभा व निवडणूका विभाग</td></tr>
<tr><td rowspan="12">ठराव:</td><td colspan="3">दि. ०२ मे, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २१३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतातील खालील ठरावात दुरुस्ती करुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td colspan="3">विषय क्र.३ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.</td><td rowspan="5">संलग्नता विभाग</td></tr>
<tr><td colspan="3">पूर्वीचा ठराव</td></tr>
<tr><td colspan="3">बी. टेक (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग) भाग-१ आणि एम. टेक. (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) भाग-१ हे नवीन अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणेकामी प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापठाच्या Under Graduate Courses Fee as per ordinance no १३०(i) & १३० (A) and Post Graduate Fee as per ordinance no १५१ New affiliation / Continuation / Extension of affiliation & Permanent affiliation या Ordinances मधील New Course नुसार बी. टेक व एम. टेक अंतर्गत येणाऱ्या नवीन अभ्यास पाठ्यक्रमाच्या प्रस्तावाचे शुल्क आकारुन अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आल.</td></tr>
<tr><td colspan="3">दुरुस्त केलेला ठराव</td></tr>
<tr><td colspan="3">बी. टेक (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग) भाग-१ आणि एम. टेक. (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) भाग-१ हे नवीन अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणेकामी प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या Under Graduate Courses Fee as per ordinance no १३०(i) & १३० (A) and Post Graduate Fee as per ordinance no १५१ New affiliation / Continuation / Extension of affiliation & Permanent affiliation या Ordinances मधील New Course ऐवजी New Subject नुसार बी. टेक व एम. टेक अंतर्गत येणाऱ्या नवीन अभ्यास पाठ्यक्रमाच्या प्रस्तावाचे शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td colspan="3">विषय क्र.२०(१) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.</td><td rowspan="6">खरेदी व भांडार विभाग</td></tr>
<tr><td colspan="3">पूर्वीचा ठराव</td></tr>
<tr><td colspan="3">महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९८.१ नुसार खरेदी समिती सुधारीत करुन सर्वानुमते खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले.</td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td>पद</td><td>नाव</td></tr>
<tr><td>४)</td><td>म.सा.वि.अ.९८(२)(घ) - व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले विद्यापीठ विभागांचे व विद्यापीठ परिसंस्थाचे दोन प्रमुख - सदस्य</td><td>प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील<br>प्रा. डॉ. जी. एस. कांबळे</td></tr>
<tr><td>५)</td><td>म.सा.वि.अ.९८(२)(ङ) - व्यवस्थापन परिषदेने त्या सदस्यांच्या निर्वाचित सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला एक सदस्य</td><td>श्री. सचिन गायकवाड</td></tr>
</table>

<table>
<tr><td rowspan="5"></td><td colspan="3">दुरुस्त केलेला ठराव</td><td rowspan="5">खरेदी व भांडार विभाग</td></tr>
<tr><td colspan="3">महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९८.१ नुसार खरेदी समिती सुधारीत करुन सर्वानुमते खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले.</td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td>पद</td><td>नाव</td></tr>
<tr><td>४)</td><td>म.सा.वि.अ.९८(२)(घ) - व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले विद्यापीठ विभागांचे व विद्यापीठ परिसंस्थाचे दोन प्रमुख - सदस्य</td><td>प्रा. डॉ. जी. एस. कांबळे<br>प्रा. डॉ. बी. जे. लोखंडे</td></tr>
<tr><td>५)</td><td>म.सा.वि.अ.९८(२)(ङ) - व्यवस्थापन परिषदेने त्या सदस्यांच्या निर्वाचित सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला एक सदस्य</td><td>श्री. सुधाकर तुकाराम सरवदे</td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२] | **प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये DATA CENTRE ची सेवा/खरेदी या कामाकरिता न्युनतम ठरलेल्या M/s.Vintech Electronic Systems Pvt. Ltd., Pune या फर्मशी वाटाघाटी करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये DATA CENTRE ची सेवा/खरेदी या कामाकरिता प्रस्ताव खरेदी व भांडार विभागास प्राप्त झाला होता.<br>त्यानुसार खरेदी व भांडार विभागामार्फत GeM Portal या संकेतस्थळावर उपरोक्त कामाकरिता Bid प्रसिध्द करण्यात आले होते. त्याच्या अंतिम मुदतीत एकूण ०४ Bid धारक प्राप्त झाले आहेत.<br>तद्नंतर सदरील Bid धारकांचे Technical Bid समिती सदस्यांसमक्ष उघडण्यात आले. तसेच Technical Bid मधील कागदपत्रे डाऊनलोड करुन प्राप्त झालेल्या एकूण चार (०४) निविदाधारकांची निविदेतील जोडण्यात आलेली तांत्रिक कागदपत्रे मा.कुलगुरु नियुक्त तज्ञ समिती सदस्यांकडून तपासणी करण्यात आली. त्यामध्ये प्राप्त झालेल्या एकूण चार (०४) निविदाधारकांपैकी ०४ ही निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या आहेत. चार ही पात्र निविदाधारकांची दराची निविदा (Financial Bid) समिती सदस्यांसमक्ष उघडण्यात येऊन दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. सदर तक्ता समितीने तपासून प्रमाणित केला आहे. समितीने प्रमाणित केलेल्या तक्त्यानुसार M/s.Vintech Electronic Systems Pvt. Ltd., Pune या फर्मचे दर न्युनतम आहेत.<br>त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये DATA CENTRE ची सेवा/खरेदी या कामाकरिता एकूण रु.६,५७,९९,९९९/- (अक्षरी रुपये सहा कोटी सत्तावन्न लाख नव्याण्णव हजार नऊशे नव्याण्णव फक्त) इतका खर्च होणार आहे. तसेच सदरचा खर्च हा वित्त व लेखा विभागाच्या Development Part-II अंतर्गत Infrastructure Reforms & Computerization in Examination या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची पडणार आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (१) नुसार रुपये दहा लाखाच्या वरील खरेदीकरिता किंवा कामाकरिता खरेदी समितीच्या मान्यतेने व वित्त व लेखा समितीची शिफारशीने सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर अंतिम मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे.<br>त्यानुसार विद्यापीठ नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये DATA CENTRE ची सेवा/खरेदी या कामाकरिता न्युनतम असलेल्या M/s.Vintech Electronic Systems Pvt. Ltd., Pune या फर्मला कार्यारंभ आदेश देण्याची बाब शनिवार, दि.०२/०५/२०२६ च्या व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवण्यात आली असता, सदर विषयावर सविस्तर चर्चा होवून संबधित DATA CENTRE ची सेवा/खरेदी कामाकरिता न्युनतम असलेल्या M/s. Vintech Electronic Systems Pvt. Ltd., Pune या फर्मला व्यवस्थापन परिषदेच्या समोर वाटाघाटीसाठी बोलावावे असे ठरले.<br>सबब, DATA CENTRE ची सेवा/खरेदी या कामाकरिता न्युनतम ठरलेल्या M/s. Vintech Electronic Systems Pvt. Ltd., Pune या फर्मशी वाटाघाटी करण्याची बाब विचारार्थ. | खरेदी व भांडार विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये DATA CENTRE ची सेवा/खरेदी या कामाकरिता न्युनतम ठरलेल्या M/s.Vintech Electronic Systems Pvt. Ltd., Pune या फर्मच्या प्रतिनिधीसोबत झालेल्या वाटाघाटीनुसार एकूण रु.६,५०,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी पन्नास लाख फक्त) इतक्या रकमेच्या कामाचे कार्यारंभ आदेश सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | **दि.०७/०५/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील पीएम-उषा योजनेअंतर्गत चालू असलेल्या बांधकामाचे वाढीव खर्चाबाबत दि.०७/०५/२०२६ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S.३३९(f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दि.०७/०५/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठरावः | **दि.०७/०५/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४(१) ] | दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या बैठकीत व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. ९ अन्वये निर्देशित केल्यानुसार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ शैक्षणिक उत्कृष्टता (ॲकॅडमिक एक्सलन्स) पुरस्कार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ तरुण शास्त्रज्ञ (यंग सायंटिस्ट) पुरस्काराची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी ठरविण्याबाबतच्या गठित समितीने दिनांक २१/०४/२०२६ रोजी दोन्ही पुरस्कारांच्या नियमावली व इतर अनुषंगिक बाबींवर चर्चा करुन सदर दोन्ही नियमावली सुधारित करुन सादर केल्या आहेत. **सदरील बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ॲकॅडमिक एक्सलन्स पुरस्कार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यंग सायंटिस्ट पुरस्काराची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी ठरविण्यासाठी दिनांक २७/११/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. ४ अन्वये खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली होती. | आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा, मा. प्र-कुलगुरु, पुअहोसोविसो. | अध्यक्ष |
| २) | डॉ. प्रशांत पवार, प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ३) | डॉ. शिवाजी शिंदे, प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ४) | डॉ. इजाज तांबोळी, प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ५) | डॉ.राजशेखर हिरेमठ, प्र.अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |

सदर समितीची बैठक दिनांक १७/०१/२०२६ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत ठरल्यानुसार दोन्ही पुरस्कारांच्या नियमावली दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात आल्या होत्या. व्यवस्थापन परिषदेने सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित केला होता.

| | | |
|---|---|---|
| | ठराव क्र.०९: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ शैक्षणिक उत्कृष्टता (ॲकॅडमिक एकलन्स) पुरस्कार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ तरुण शास्त्रज्ञ (यंग सायंटिस्ट) पुरस्काराची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी संदर्भात गठित समितीकडे पुर्नविचारार्थ ठेवण्यात यावा व त्यानंतर व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>सदर ठरावानुसार दोन पुरस्कारांची नियमावली व इतर अनुषंगिक बाबींचा पुर्नविचार करुन नियमावली ठरविण्यासाठी गठीत समितीची बैठक दिनांक २१/०४/२०२६ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर समितीने सर्वंकष चर्चा करुन पुरस्कारांच्या नियमावली तयार करुन आस्थापना विभागास सादर केल्या आहेत.<br>सदर पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम रु.१०,०००/- व प्रमाणपत्र असे असल्याने आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून या दोन्ही पुरस्काराकरिता व अनुषंगिक प्रशासकीय कार्यवाहीच्या खर्चासाठी रु. ५०,०००/- ची तरतूद नव्याने करण्याची बाब, समितीने तयार करुन दिलेल्या दोन्ही पुरस्काराच्या नियमावली व इतर अनुषंगिक बाबी व सदरील पुरस्काराची प्रशासकीय कार्यवाही (प्रस्ताव मागविणे, त्याची छाननी करणे व इतर कामे) करण्यासाठी पुरस्कार कार्यासनास हस्तांतरण करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या बैठकीत व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. ९ अन्वये निर्देशित केल्यानुसार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ शैक्षणिक उत्कृष्टता (ॲकॅडमिक एक्सलन्स) पुरस्कार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ तरुण शास्त्रज्ञ (यंग सायंटिस्ट) पुरस्काराची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी ठरविण्याबाबतच्या गठित समितीने दिनांक २१/०४/२०२६ रोजी दोन्ही पुरस्कारांच्या नियमावली व इतर अनुषंगिक बाबींवर चर्चा करुन सादर केलेल्या सुधारित नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [४(२)] | **विद्यापीठातील ३५ एकर परिसरात बालाजी अमाईन्स लि., सोलापूर यांना उद्यम प्रेरणा केंद्र इमारत बांधकाम करण्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत व सदरची इमारत विद्यापीठास हस्तांतरित करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठातील ३५ एकर परिसरात बालाजी अमाईन्स, सोलापूर यांनी उद्यम प्रेरणा केंद्र इमारत बांधकाम करणेबाबत मे. बालाजी अमाईन्स, सोलापूर यांनी दि.०७/०५/२०२६ रोजी सादर केलेले पत्र आणि पत्रासोबतचा नकाशा सोबत जोडला आहे<br>पत्रातील नमूद मुद्दे खालीलप्रमाणे<br>१. Total Area: ६२५ Sq. meter (ग्राउंड फ्लोअर) + ६२५ Sq. meter (पहिला मजला)<br>२. सदरची इमारत स्टार्ट-अप, नवोन्मेषक आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (MSME) अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करणे.<br>३. सदर इमारतीमध्ये स्टार्टअप केबिन, प्रशिक्षण आणि परिषद सभागृह आणि प्रयोगशाळा इ.<br>सबब, उपरोक्त प्रमाणे आणि सोबत जोडलेल्या पत्र आणि नकाशानुसार विद्यापीठातील ३५ एकर परिसरात बालाजी अमाईन्स लि., सोलापूर यांना उद्यम प्रेरणा केंद्र इमारत बांधकाम करण्याकरिता जागा उपलब्ध करुन देणे व सदरची इमारत विद्यापीठास हस्तांतरित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **विद्यापीठातील ३५ एकर परिसरातील विद्यापीठ सभागृह व सोलापूर-पुणे हायवे यामधील ६२५ Sq. meter (ग्राउंड फ्लोअर) + ६२५ Sq. meter (पहिला मजला) जागा बालाजी अमाईन्स लि., सोलापूर यांना उद्यम प्रेरणा केंद्र इमारत बांधकाम करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.**<br>**तसेच सदर इमारतीस "बालाजी - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ उद्यम प्रेरणा केंद्र" हे नाव देऊन विद्यापीठास हस्तांतरित करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[४(३)]</td><td>

**विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये LIFT बसविण्याकरिता GEM Portal वरुन मागविण्यात आलेल्या निविदेतील सर्वात कमी दर असलेले M/s. AGT ENERGIES, Chandrapur यांच्या समवेत दर वाटाघाटी (Negotiation) करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये LIFT बसविण्याकरिता रु.१,२०,००,०००/- इतक्या रकमेचे GEM Portal वर जाहिरात प्रसिध्द करण्याच्या सादरीकरणावर मान्यता घेऊन, खरेदी व भांडार विभागामार्फत दि.१८/०३/२०२६ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन अंतिम मुदत दि.०८/०४/२०२६ रोजी पर्यंतची देण्यात आली होती. दिलेल्या अंतिम मुदतीमध्ये एकूण ११ ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

प्राप्त सर्व ११ ई-निविदा दि.०९/०४/२०२६ रोजी Technical Bid उघडण्यास मंजूरी घेण्यात आली. त्यानुसार ११ ई-निविदाधारकांच्या निविदेतील तांत्रिक कागदपत्राची तपासणी केली असता, प्राप्त ११ पैकी ३ निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरले आहे. त्यानुसार पात्र सर्व दराच्या ई-निविदा खरेदी समिती व वित्त व लेखा अधिकारी यांच्या समक्ष उघडण्यात आले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

<table>
<tr><th></th><th>M/s. AGT ENERGIES, Chandrapur</th><th>M/s. CHAKRIKA VENTURES</th><th>M/s. TECHNO INDUSTRIES PRIVATE LIMITED</th></tr>
<tr><td>Total Amount with GST</td><td>1,27,51,839.36/-</td><td>1,37,98,590.84/-</td><td>1,78,17,984/-</td></tr>
</table>

सदर कामास सर्वात कमी दर म्हणजे रक्कम रुपये १,२७,५१,८३९.३६/- GST सह इतके M/s. AGT ENERGIES, Chandrapur या फर्मने नमूद केलेला आहे.

सदरच्या दराची वाटाघाटी (Negotiation) करण्याकरिता संबंधित मक्तेदारास जा.क्र. पुअहोसोविसो/अभियांत्रिकी विभाग/२०२६/४२०८, दि.०६/०५/२०२६ रोजी पत्राद्वारे कळविण्यात आले असता, दि.०६/०५/२०२६ रोजी सर्वात कमी दर नमूद केलेले मक्तेदार, प्रा.देवानंद काशिनाथ चिलवंत, डॉ. सुशिल कुमार शिंदे, डॉ. समाधान दिगंबर पवार व प्राचार्य डॉ.कैलाश जगन्नाथ करांडे यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर सदस्यांनी फर्म समवेत तांत्रिकदृष्टया सविस्तर चर्चा करुन दर वाटाघाटीसाठी दि.१२/०५/२०२६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर दर वाटाघाटी करण्याचे अधिकार असलेल्या व्यक्तीस बोलवावे असे सुचविले.

सबब, विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये LIFT बसविण्याकरिता GEM Portal वरुन मागविण्यात आलेल्या निविदेतील सर्वात कमी दर असलेले M/s. AGT ENERGIES, Chandrapur यांच्या समवेत दर वाटाघाटी (Negotiation) करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

</td><td>अभियांत्रिकी विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये LIFT बसविण्याकरिता GEM Portal वरुन मागविण्यात आलेल्या निविदेतील सर्वात कमी दर असलेले M/s. AGT ENERGIES, Chandrapur या फर्मच्या प्रतिनिधीसोबत झालेल्या वाटाघाटीनुसार एकूण रु.१,२१,५०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी एकवीस लाख पन्नास हजार फक्त) GST सह इतक्या रकमेच्या कामाचे कार्यारंभ आदेश सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [४(४)] | **शास्त्रीय उपकरण केंद्रामधील NMR, XRD, TGA & DSC या उपकरणांचे Upgradation करण्याची बाब विचारार्थ.** | शास्त्रीय उपकरण केंद्र |

टिपणी: शास्त्रीय उपकरण केंद्रामध्ये ४०० MHz NMR, XRD, TGA & DSC हे उपकरणे सन २०१२ ते २०१६ या कालावधीत खरेदी करण्यात आलेले आहेत. सदरची उपकरणे ही मागील दहा-बारा वर्षापासून कार्यरत आहेत. सद्यस्थितीत उपरोक्त उपकरणांचे Hardwares and Softwares हे Outdated झाले असल्याने तसेच काही उपकरणांचे Accessries Modifacions करणे आवश्यक असल्याने सद्यस्थितीत कार्यरत उपकरणांचे Upgradation करणे अत्यावश्यक आहे. सदर उपकरणांचे Upgradation केल्यामुळे ही उपकरणे पुढील बारा-पंधरा वर्षाकरीता अधिक कार्यक्षमतेने कार्यरत होतील. उपरोक्त उपकरणांच्या Manufacturer / Supplier Firm यांच्याशी E-mail द्वारे संपर्क केला असता, संबंधित Supplier Firm यांनी Upgradation करण्यासाठी Quotation पाठविले आहे. उपरोक्त उपकरणांचे Upgradation संबंधित Supplier Firm कडून एकल स्रोत प्रक्रियानुसार करावे लागेल. सदरची माहिती खालील तक्त्यामध्ये नमूद केली आहे.

| Sr. No. | Name of Equipment | Supplier Name | Revenue Generated INR | Deprication Cost INR | Cost of Upgradation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | NMR (400 MHz) Make: Bruker | Ms. Bruker India Pvt. Ltd DOI: 03/07/2013 | 75,20,910 | 73,92,795 | 2,83,433.35 USD Approx 2,63,53,513 INR Excluding Taxes |
| 2 | XRD Make: Rigaku Ultima | Ms. IR Tech Service Pvt. Ltd DOI: 23/05/2014 | 28,82,350 | 36,31,202 | 10,80,000 YEN Approx. 6,33,000 INR Excluding Taxes |
| 3 | TGA and DSC Make: Mettler-Toledo | Ms. Mettler-Toledo India Pvt. Ltd DOI: 06/02/2016 | 9,86,700 | 40,09,159 | 1,25,32,137 INR Including Taxes |
| | Approximate Expenditure in INR | | | | 3,95,18,649.00 |

सबब, शास्त्रीय उपकरण केंद्रामध्ये ४०० MHz NMR, XRD, TGA & DSC या उपकरणांचे संबंधित Suppler Firm कडून एकल स्रोत प्रक्रियेनुसार Upgradation करण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **शास्त्रीय उपकरण केंद्रामध्ये ४०० MHz NMR, XRD, TGA & DSC या उपकरणांचे संबंधित Suppler Firm सोबत चर्चा करुन Upgradation करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | डॉ. अजित माधव पाटणकर | अध्यक्ष |
| २. | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य |
| ३. | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य |
| ४. | डॉ. मकरंद कुलकर्णी, Instrument Expert | सदस्य सचिव |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४(५)] | **विद्यापीठ नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये गट क्र. ३५६, ३५७, ३६५, ३६६, ३६७, ३६८/२, ३६८/४, ३६८/५, ३६८/६ या सर्व गटांमध्ये नवीन एच.टी कनेक्शन ११ के.व्ही. या ठिकाणी देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: दि.१३/०३/२०२६ रोजी विद्यापीठ नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये नवीन एच.टी ११ के.व्ही कनेक्शन मिळण्याबाबत मा. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सोलापूर यांना पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने दि.११/०५/२०२६ रोजी नवीन एच.टी कनेक्शन देणेकरिता खालीलप्रमाणे दरपत्रक सादर केले आहे. | अभियांत्रिकी विभाग |

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | Fixed Service Connection charges | Rs.3167.00 GST:-Rs.00 |
| 2 | Estimated Cost incl (89.94%) Centages for 100% DDF | Rs. 5958.00 GST:Rs.00 |
| 3 | Security Deposit | Rs. 35,42,672.00 |
| 4 | Testing fee of T/F | Will be initiated by E.E Testing |
| 5 | Cost of Agreement forms | Bond to be procured by the applicant |
| 6 | Processing fee paid on 02.03.02026 | Rs. 2780.00 GST: 00 |
| 7 | Modem/Installation | Modem to be install by the applicant as per EET specifications |
| 8 | Other Charges | Nil |
| 9 | Total Diff | Rs.35,51,797.00 |

वरीलप्रमाणे सुरक्षा ठेव रक्कम रुपये ३५,५१,७९७/- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सोलापूर यांना भरण्यास व काम करुन घेण्यास तसेच सदरचे एच.टी कनेक्शन व इतर जोडणीचे काम करण्यासाठी रक्कम रुपये ९,८५,०००/- इतका खर्च असून रक्कम रुपये ३५,५१,७९७ + ९,८५,०००/- असे एकूण रक्कम रुपये ४५,३६,७९७/- खर्चासाठी प्रशासकीय मान्यतेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव: **विद्यापीठ नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये गट क्र. ३५६, ३५७, ३६५, ३६६, ३६७, ३६८/२, ३६८/४, ३६८/५, ३६८/६ या सर्व गटांमध्ये नवीन एच.टी कनेक्शन ११ के.व्ही. घेण्यासाठी खालील बाबीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

१. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सोलापूर यांचेकडे रुपये ३५,५१,७९७/- इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून भरण्यास मान्यता देण्यात आली.**
२. **सदरचे एच.टी कनेक्शन व इतर जोडणीचे काम करण्यासाठी रक्कम रुपये ९,८५,०००/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

मा. कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद